Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**


PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 200


## Cotemporary Problems in India and Remidies


**Guest Editor :**
Dr. R. V. Shikhare
Principal
R. B. Attal Arts, Science & Commerce College,
Georai, Dist. Beed (M.S) India

**Associate Editors -**
Mr. H. B. Helambe
Mr. B. S. Jogdand
Mr. R. B. Kale
Mr. S. S. Nagare
Mr. R. B. Pagore

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)



This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

ISSN : 2348-7143
October-2019


| | | | |
|---|---|---|---|
| 101 | ग्रामीण महिला सक्षमीकरणात डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांचे योगदान | डॉ. कैलास ठोंबरे व डॉ.राजाभाऊ गायकवाड | 416 |
| 102 | वाढता दहशतवाद आणि भारत | डॉ. केशव लहाने | 422 |
| 103 | जागतिक तापमान वाढ व भारताची राष्ट्रीय सुरक्षा | डॉ. किरण चक्रे | 427 |
| 104 | पर्यावरण प्रदूषण व उपाय | डॉ. राखी सलगर | 434 |
| 105 | शाश्वत विकास आणि भारतीय सद्यस्थिती | डॉ. रमेश वाघमारे | 438 |
| 106 | दहशतवाद : एक गंभीर समस्या | डॉ. साहेब राठोड | 442 |
| 107 | भारतासमोरील आव्हाने : विशेष संदर्भ दारिद्र्य | डॉ. सिद्धेश्वर सटाले | 445 |
| 108 | दहशतवादाचे प्रकार : एक अभ्यास | डॉ. डी.एस.शिंदे | 448 |
| 109 | बेकारी : एक राष्ट्रीय समस्या | डॉ. शिवाजी चौगुले | 452 |
| 110 | समकालीन भारतीय अर्थकारण : समस्या आणि उपाययोजना | डॉ. शिवराज पाटील | 457 |
| 111 | दहशतवाद आणि समाज : एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. सुनिल जाधव | 460 |
| 112 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाय | डॉ. सुरेश सामाले | 463 |
| 113 | दारिद्र्य : देशाच्या विकासापुढील एक समस्या | डॉ. टी.आर.फिसफिसे | 468 |
| 114 | सायबर गुन्हेगारीतून निर्माण होणारा दहशतवाद | डॉ. सुनिता टेंगसे व गोपाळ गांगुर्डे | 473 |
| 115 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाययोजना | गौरव पाटील | 479 |
| 116 | मानवी जीवनावर होणारे पर्यावरण प्रदूषणाचे दुष्परिणाम | डॉ. संदीपान गायके | 484 |
| 117 | भारतीय राजकारण आणि धर्म | डॉ. जे.एस.ढवळे | 487 |
| 118 | भारतातील सायबर गुन्हे : एक अवलोकन | डॉ. जयसिंग सिंगल | 489 |
| 119 | दारिद्र्याचे समाजशास्त्रीय अध्ययन : एक अभ्यास | दलित कांबळे व डॉ. दिपक धारवाडकर | 498 |
| 120 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाययोजना | प्रा. नंदकुमार कुकलारे | 502 |
| 121 | नक्षलवाद : एक समाजशास्त्रीय आकलन | मीना राजपूत व डॉ. जी.एच.बानायत | 508 |
| 122 | कोरडवाहू शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | डॉ. जयदेव मोहिते | 513 |
| 123 | आदिवासी इतिहासलेखनातील डॉ. जिरेवाड सर यांचे योगदान | नितीन क्षीरसागर | 516 |
| 124 | इस्लामी व्याजपद्धती - अर्थशास्त्रीय अभ्यास | डॉ. सय्यद मुसा | 519 |
| 125 | भ्रष्टाचार- एक गंभीर समस्या | डॉ. अनंत नरवडे | 522 |
| 126 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य सामाजवादातील आर्थिक विचार | प्रा. वितेश निकते | 527 |
| 127 | भ्रष्टाचार आणि क्रीडा स्पर्धा | प्रा. भारत पल्लेवाड | 530 |
| 128 | पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज | डॉ. किरण पिनाटे | 533 |
| 129 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय | प्रा. आर.एस.पोपळघट | 536 |
| 130 | भारतातील भ्रष्टाचाराची समस्या | प्रा. प्रकाश काळवणे | 541 |
| 131 | सायबर गुन्हेगारी एक सामाजिक समस्या | प्रा. एच.आर.खेत्री | 545 |
| 132 | बालगुन्हेगारी समस्या : समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. आर.बी.काळे व प्रा.जी.टी.मोकासरे | 548 |
| 133 | दहशदवाद : समकालीन प्रश्न आणि उपाय | डॉ. आर.के.काळे | 552 |
| 134 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील समस्यांचे चित्रण | प्रा. संदिप परदेशी | 559 |
| 135 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या समस्या व उपाय | प्रा. इंदू साळुंके | 563 |
| 136 | रत्नागिरी जिल्ह्याचे उत्पन्न आणि दारिद्र्याचे स्वरूप | प्रा.एल.एस.सिताफुले | 568 |
| 137 | स्त्री शिक्षण समस्या व उपाय | प्रा. सीताराम मोगल, भागवत गोरे | 575 |
| 138 | भ्रष्टाचाराचे ग्रामीण समाजावर झालेली परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ मुदखेड तालुका, जिल्हा नांदेड) | डॉ. दत्ता तंगवलवाड | 579 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

# भारता समोरील आव्हाने : विशेष संदर्भ दारिद्र्य

**डॉ. सिध्देश्वर सटाले**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, गेवराई
मो. ९४२३५५९८९९

**गोषवारा :-**

दारिद्रय ही दरिद्री व्यक्ती समोरील आणि राष्ट्रा समोरील गंभीर स्वरुपाची समस्या आहे दारिद्र्याचे भयंकर परिणाम जसे दारिद्री व्यक्तीला भोगावे लागतात. तसेच राष्ट्राला किंवा सरकारलाही भोगावे लागतात. दारिद्र्यामुळे कुटुंबाची प्रगती होत नाही. त्यामुळे चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळू शकत नाहीत.

त्यामुळे दरिद्री कुटुबाचा गाडा दारिद्र्याच्या चिखलात अधिकच रुतून बसतो दारिद्र्यामुळे कुटुंबातील कोणालाच पोटभर व चांगले अन्न मिळू शकत नाही. त्यामुळे दारिद्री कुटुंबातील व्यक्तीची कार्यक्षमता अत्यंत कमी राहते. कार्यक्षमता कमी राहिल्याने योग्य मजुरी मिळत नाही व दारिद्र्याचा प्रश्न अधिकच गंभीर होतो.

**मुख्य शब्द :-**

दारिद्रय, स्वातंत्र्य, लोकशाही, किमान, सुखसोयी, दारिद्ररेषा.

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने लोकशाही व्यवस्था स्विकारणे हे स्वातंत्र्य चळवळीचे फलीत असून वर्तमानकालीन पिढीला मागील पिढीने दिलेला अनमोल ठेवा आहे. आजघडीला अनेक आफ्रो-आशियाई देशांमध्ये लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी एकाधिकारशाहीच्या विरोधात होत असलेले उठाव, संघर्ष पाहता भारतीय लोकशाहीचे महत्व वाढत आहे. आधोरेखित आपण लोकशाही व्यवस्थेत स्वीकार करुन सहा दशकांचा कालावधी लोटला आहे. हीपण फार मोठी उपलब्धी आहे. अर्थात युरोपियन लोकशाहीप्रधान राष्ट्र राज्यांमध्ये जी लोकशाही विकसित झालेली दिसते तो अनुभव आपल्याला आपल्या लोकशाहीबद्दल दिसत नाही. त्याला अनेक विविध कारणे आहेत. भारतीय लोकशाही सर्व देशांपुढे आदर्श असताना भारतीय लोकशाहीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे दिसते.

भारतीय लोकापुढील आव्हानांच्या संदर्भात चर्चा करताना प्रामुख्याने गरीबी, बेरोजगारी, विषमता वाढत चाललेली लोकसंख्या, निरक्षरता, अज्ञान या आव्हानांची चर्चा करीत आहोत अर्थात आज ही ती कमी झालेली नाहीत. काही आव्हानांना यशस्वी सामोरे गेले की, बदलत्या परिस्थितीतून निर्माण झालेली नवीन आव्हाने उभी राहतात. बेरोजगारी हा घटक मोठी समस्या म्हणून पुढे येत आहे. उदारीकरणाच्या नावाखाली शासन सद्या विभिन्न घटकांचे संरक्षण काढून घेत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून लवकरच ६७ वर्षे पूर्ण होतील देशामध्ये घटनात्मक सरकार स्थापन झाल्यास सुध्दा ६२ वर्षे होऊन गेली. या काळांमध्ये अकरा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या बारावी योजना सुर आहे. समाजिक न्यायासह आर्थीक विकास हे आपले उदिष्ट राहिले आहे. बहुतेक सर्वच अविकसित देशांमध्ये दरडोई उत्पन्न अत्यंत कमी असून आर्थिक विषमता आढळून येते. यामुळे दोष निर्माण झाले असून गरीबी किंवा दारिद्रय हा सर्वात गंभीर परिणाम आहे.

**गरीबीची संकल्पना :- CONCEPT OF POVERY**

किमान उपभोग दर्जा गाठणे ज्या व्यक्तीला शक्य होत नाही त्यांना गरीब असे म्हणता येईल किमान राहणीमान दर्जा ठेवण्यासाठी किती जगात सर्वप्रथम दारिद्रेरेषेची व्याख्या इंग्लडमध्ये १९ व्या शतकाच्या शेवटी करण्यात आली तर

भारतात १९७९ मध्ये दारिद्रय रेषा स्वीकारण्यात आली भारतात दांडेकर आणि रथ मिन्हास, अहलुवालिया बर्धन, नियोजन मंडळ व नियोजन मंडळाने नेमलेल्यातून अभ्यासकारांनी भारतातील दारिद्रय रेषा निश्‍चित करण्याचा प्रयत्न केला.

व्यक्तीची किंवा कुटुंबाची जीवनावश्यक गरजा भागविण्याची असमर्थता म्हणजे दारिद्रय व या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी जेवढे उत्पन्न पाहिजे त्यापेक्षा कमी उत्पन्न असेल तर तो दारिद्ररेषेच्या खाली आहे असे म्हणता येते.

२०००-२००१ या जागतिक विकास अहवाल सुस्थिती पासून संपूर्णपणे वंचित असणे म्हणजे दारिद्र होय.

**गोगार्ड :-**

दारिद्र म्हणजे स्वत:वर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीचे पालनपोषण करण्यासाठी तसेच निरोगी उत्साही राहण्यासाठी लागणाऱ्या जरुरीच्या वस्तुचा अपुरा पुरवठा होय.

**अमत्य सेन :-**

समाजातील इतरांपेक्षा जास्त गरीब असणे असा अर्थ नाही तर दारिद्रय म्हणजे ऐहिक सुखसोही मिळविण्यासाठी आवश्यक असलेली किमान संधी मिळणे म्हणजे दारिद्रय होय.

**संशोधनाचे महत्व :-**

संशोधन म्हणज केवळ सामाजिक घटनांचे संशोधन नाही तर त्या अध्ययन कार्यास अधिकाधिक यथार्थ बनविण्यासाठी नवनवीन तंत्राचा शोध लावला जातो. त्यामुळे समाजशास्त्राची प्रगती होते. संशोधनातून नवीन ज्ञान आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याची शक्ती वाढते. सामाजिक जीवनासंबंधित तथ्यांचा शोधही घेतला जातो. त्यामुळे संशोधनाचे महत्व प्राप्त होते.

संशोधनाच्या माध्यमातून दारिद्र्याची वास्तविकता समोर येण्यास मदत होईल.

संशोधनाच्या माध्यमातून दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारने केलेल्या विविध योजनाची माहिती मिळेल.

**संशोधनाची उदिष्ट्ये :-**

१. दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी विविध निकशांतील बदलांचे अध्ययन करणे.
२. दारिद्र्यामुळे निर्माण झालेल्या विविध सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.
३. वाढती लोकसंख्या दारिद्रय व बेकारी यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-**

संशोधनासाठी उपयुक्त माहिती ही सर्वेक्षणातून प्राप्त झाली. संशोधन करतांना संशोधनासाठी समाजाची सामाजिक अवस्था स्थिती, व परिस्थिती इत्यादी विविध घटकांचा अभ्यास करुन त्या संबंधी माहिती एकत्रित करुन त्यांचे विश्लेषण मांडणी करण्यास संशोधकास सर्वेक्षण पध्दती उपयुक्त ठरली आहे.

**तथ्य संकलन :-**

प्राथमिक स्त्रोत

व्दितीय स्त्रोत

१) विविध संकेतस्थळे
२) आर्थिक सर्वेक्षण
३) मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे

सुरेश तेंडूलकर समिती दारिद्रय रेषा निश्चित करण्यासंदर्भातील पध्दतीनुसार Tendulkar committee methodology घरगुती उपभोग खर्चाच्या NSSO संस्थेने केलेल्या ६८ व्या नमुना पाहणीच्या आधारे भारतातील दारिद्र्याचे प्रमाण २०११ -२०१२ मध्ये पुढीलप्रमाणे आहे.

२०११ - २०१२ मधील दारिद्रय प्रमाण

| | |
|---|---|
| ग्रामीण | २५.७% |
| शहरी | १३.७% |
| एकूण | २१.९% |

राष्ट्रीय स्तरावर एकूण प्रमाण राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या ६८ व्या पाहणीच्या अधारे २१.९७ इतके आहे तर २००४-०५ मध्ये ग्रामीण भागात ४१.८ प्रतिशत तर नागरी भागात २५.७ प्रतिशत लोकसंख्या आहे. अलिकडेच तेंडूलकर समितीच्या मानांकाच्या आधारे अनेक तज्ज्ञानी केलेल्या सर्वेक्षणानुसार अंदाजानुसार २०११-१२ मध्ये देशातील दारिद्र्याचे प्रमाण २६ टक्क्यांपर्यंत आहे म्हणजेच देशातील १ / ४ पेक्षा जास्त लोकसंख्या दारिद्र्यात जीवन जगत आहे. यावरुन या समस्येचे गांभीर्य लक्षात येते. भारतातील दारिद्र्याच्या दाहकतेचे वर्णन करताना जागतिक अर्थतज्ज्ञ व हरितक्रांतीचे प्रणेते डॉ.एम.एस. स्वामीनाथन म्हणतात. दारिद्र्याच्या सागरात आपण म्हणजे दारिद्रय नसणारे बेट म्हणून आनंदीमय जगू शकत नाही.

दारिद्रयरेषेखालील लोकांच्या जीवनात बदल करण्यासाठी काही शाश्वत मार्ग किंवा उपाय सूचविले आहे.

१. कृषी भूमीहीन शेत मजुरांना मालकीची जमीन मिळाल्यास व उत्पादन वाढविण्यास आवश्यक ती आर्थीक मदत, साधणे व मार्गदर्शन मिळाल्यास त्यांच्या उत्पन्नात भर पडू शकते.
२. लहान शेतकऱ्यांना जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी जरुर त्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.
३. भाववाढीमुळे गरिब लोकांना दारिद्रय अधिक कष्ट्प्रत होते. म्हणून श्रीमंताची क्रयशक्ती कमी करुन तिचे सुयोग्य वाटप केल्यात गरिबांची क्रयशक्ती वाढते.
४. केवळ राष्ट्रीय उत्पादक व संपत्तीत वाढ झाल्याने देशातील दारिद्रय नाहिसे करता येईल असे नाही तर उत्पादनात वाढ कोणत्या वस्तुंची व सेवांची होते व तिचे व संपत्तीचे वाटप दारिद्रय कमी करण्याच्या दृष्टिने कितपत सुयोग्य आहे हा प्रश्न महत्वाचा आहे.
५. श्रमप्रधान प्रकल्पांना अग्रक्रम देणे आवश्यक आहे तरच देशातील बेकार व अर्धबेकार श्रमिकांना किफायतशीर रोजगार मिळेल.

**समारोप :-**

दारिद्रय ही दरिद्री व्यक्ती समोरील आणि राष्ट्रा समोरील गंभीर स्वरुपाची समस्या आहे दारिद्र्याचे भयंकर परिणाम जसे दारिद्री व्यक्तीला भोगावे लागतात. तसेच राष्ट्राला किंवा सरकारलाही भोगावे लागतात. दारिद्र्यामुळे कुटुंबाची प्रगती होत नाही. त्यामुळे चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळू शकत नाहीत.

त्यामुळे दरिद्री कुटुबाचा गाडा दारिद्र्याच्या चिखलात अधिकच रुतून बसतो दारिद्र्यामुळे कुटुंबातील कोणालाच पोटभर व चांगले अन्न मिळू शकत नाही. त्यामुळे दारिद्री कुटुंबातील व्यक्तीची कार्यक्षमता अत्यंत कमी राहते. कार्यक्षमता कमी राहिल्याने योग्य मजुरी मिळत नाही व दारिद्र्याचा प्रश्न अधिकच गंभीर होतो.

**संदर्भ सूची :**

**१.** लाटे संजीव दारिद्र्याचे मोजमाप दारिद्र्य - एक दृष्टीक्षेप, अर्पणपत्रिक २० मार्च २०१३
**२.** कुरुलकर, भारतीय अर्थव्यवस्था विधा प्रकाशन नागपुर, प्रथमावृत्ती जाने २००१.
**३.** गरिबांची संख्या का वाढते आहे, लोकसत्ता ११ मार्च २०१५.
**४.** अनंद टि.सी. गरिबी व आकलन "योजना ऑक्टोबर २०१३